MHSO140007912010

दाखल तारीखः–    ०४/०३/२०१०
नोंद तारीखः–    ०४/०३/२०१०
निकाल तारीखः–    १७/०३/२०२६
कालावधीः– १६ वर्षे ०० महिने १३ दिवस

| | | |
|---|---|---|
| | **मे. जी. एस. पाटील यांचे न्यायालयात**<br>**सध्या – प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ता.बार्शी, जि. सोलापूर**<br>**(न्यायनिर्णय दिनांक १७ मार्च, २०२६)**<br>**(नियमित फौजदारी खटला क्र. २०६/२०१०)    नि.क्र. ५६** | |
| | (एफ.आय.आर/गुन्हा नं.७९/२००९ पांगरी पोलीस स्टेशन) | |
| तक्रारदार / अभियोगपक्ष | | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पांगरी पोलीस ठाणे, ता. बार्शी,<br>जि. सोलापूर. |
| व्दारे प्रतिनिधित्व | | सहा.सरकारी अभियोक्ता श्री. आर.बी. काजळे |
| आरोपी | | १. सतीश काळू शिंदे,<br>वय – ६० वर्षे, धंदा– मजुरी,<br>२. शांताबाई सतीश शिंदे,<br>वय – ५५ वर्षे, धंदा –मजुरी,<br>३. शिवाजी सतीश शिंदे,<br>वय – ३६ वर्षे, धंदा – मजुरी,<br>४. उत्तम काळू शिंदे,<br>वय – ६० वर्षे, धंदा – मजुरी,<br>सर्व रा. कारी, ता. बार्शी, जि. सोलापूर. |
| व्दारे प्रतिनिधित्व | | विधिज्ञ श्रीमती. यु. एन. पवार. |

| | |
|---|---|
| गुन्हयाचा तारीख | ०८/०६/२००९ |
| एफ.आय.आर तारीख | ०९/०६/२००९ |
| दोषारोपपत्र तारीख | ०४/०३/२०१० |
| दोषारोप तारीख | १९/१२/२०१७ |
| पुरावा सुरुवात तारीख | २९/०८/२०२३ |
| निकाल राखुन ठेवला ती तारिख | निरंक |
| निकालाची तारिख | १७/०३/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | --- |

**आरोपी तपशिल**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारिख | जामिनावर सुटकेची तारिख | दोषारोप | जर निर्दोष अथवा दोषी असेल तर | शिक्षा ठोठावलेली शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम ४२८ चे उद्देशाने खटल्या दरम्यान कोठडी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सतीश काळू शिंदे | ०९/०६/०९ | ११/०६/०९ | भा.द.वि.कलम ४५२,३५४, ३२३,५०४, सहकलम ३४ | निर्दोष | -- | -- |
| २. | शांताबाई सतीश शिंदे | ०९/०६/०९ | ११/०६/०९ | वरीलप्रमाणे | निर्दोष | -- | -- |
| ३. | शिवाजी सतीश शिंदे | ०९/०६/०९ | ११/०६/०९ | वरीलप्रमाणे | निर्दोष | -- | -- |
| ४. | उत्तम काळू शिंदे | ०९/०६/०९ | ११/०६/०९ | वरीलप्रमाणे | निर्दोष | -- | -- |

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी**

**अ. अभियोगपक्षः**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | | वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
| अ.सा. १ | राणी अनिल काळे (नि.क्र.४२) | फिर्यादी |
| अ.सा. २ | सुरेश जिवन पवार (नि.क्र.४३) | जखमी साक्षीदार. |

**ब. बचावपक्षाचा साक्षीदारः नाही.**

**क. न्यायालयीन साक्षीदारः नाही.**

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदार निशाणी यादी**

**अ. अभियोगपक्षः**

| अ.क्र. | निशाणी क्रंमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.४१ | तडजोड पुरसीस |
| २. | निशाणी क्र.४६ | घटनास्थळ पंचनामा |
| ४. | निशाणी क्र.४४ व ४५ | वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ५. | निशाणी क्र.५२ | फिर्यादीतर्फे पुरावा बंद पुरसिस. |

**ब. बचावपक्ष : तपासले नाही.**

**क. न्यायालयीन निशाणीः नाही.**

**ड. मुद्देमाल क्रमांक : आहे.**

| अ.क्र. | मुद्देमाल वर्णन | मुद्देमाल क्रमांक |
|---|---|---|
| १. | दोन लाकडी काठी | ६८/२००९ |

## <u>न्यायनिर्णय</u>

## (घोषित दिनांक १७ मार्च, २०२६)

१. प्रस्तुत प्रकरणातील आरोपी क्र.१ व ४ यांचेविरुध्द भारतीय दंड विधानचे कलम ४५२, ३५४, ३२३, ५०४ सहकलम ३४ अन्वये दंडनीय अपराध केल्याच्या आरोपाखाली फौजदारी खटला चालविण्यात आला.

२. **अभियोग पक्षाची हकीकत पुढीलप्रमाणे अशी आहे की,**

प्रस्तुत प्रकरणामध्ये राणी अनिल काळे, रा.कारी, ता. बार्शी या फिर्यादी

आहेत. फिर्यादी या त्यांचे आई, वडीलांसह एकत्र कुटूंबात राहणेस असून मजुरी करुन कुटूंबाचा उदरनिर्वाह करतात. दिनांक ०८/०६/२००९ रोजी रात्री ८:०० वाजताचे सुमारास फिर्यादी घरी स्वयंपाक करीत असताना मेव्हणा आरोपी ४ उत्तम काळु शिंदे हा दारु पिवून घरी आला व तो घरात येवून फिर्यादीशी झोंबाझोबी करुन फिर्यादीचे स्तन दाबून अगांवरील ब्लाउज फाडून काढण्याचा प्रयत्न करु लागला. त्यामुळे फिर्यादी मोठमोठयाने आरडा ओरडा केला. त्यावेळी फिर्यादीची चुलत बहीण विजयमाला सुनील भोसले, सुरेखा सुदाकर पवार, सुरेश जीवन पवार वैगेरे लोक धावत आले. त्यावेळी आरोपी क्र.४ उत्तर शिंदे याने चुलीतील जळते लाकून हातात घेवून आरडा ओरडा करुन फिर्यादीच्या कमरेवर मारले. त्यामुळे फिर्यादीच्या कमरेला जाळचा चटका बसला व अंगावरील साडी, परकर जळाला. त्यानंतर फिर्यादीच्या मदतीसाठी लोक जमा झालेनंतर आरोपी क्र. ४ उत्तर शिंदे यास घरात कशामुळे शिरला असे विचारत असता, तेथे आरोपी क्र. ४ चा भाउ आरोपी क्र.१ सतीश काळु शिंदे, आरोपी क्र.३ शिवाजी सतीश शिंदे व आरोपी क्र.२ शांताबाई सतीश शिंदे यांनी तेथे येवून फिर्यादी व साक्षीदार यांना घरातील सरपनातील लाकडे घेवून मारहाण केली. तसेच शिवीगाळ करुन निघून गेले. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४५२, ३५४, ३२३, ५०४ सहकलम ३४ अन्वये पांगरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला.

३. सदर फिर्यादच्या आधारे पांगरी पोलीस स्टेशन येथे भा.द.वि. कलम ४५२, ३५४, ३२३, ५०४ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा रजिस्टर नं. ७९/२००९ दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पो.हे.कॉ श्री. काळे, पोलीस पोलीस स्टेशन यांनी केला. तपासाअंती आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४५२, ३५४, ३२३, ५०४ सहकलम ३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपी हजर झाल्यानंतर (नि.क्र.२४) नुसार आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४५२, ३५४, ३२३, ५०४ सहकलम ३४ अन्वये दोषारोप निश्चित केले. आरोपींना ते वाचून दाखविले असता आरोपींनी (नि.क्र.२५ ते २८) प्रमाणे गुन्हा नाकबूल करुन प्रकरणाची संपरिक्षा करावी अशी विनंती केली.

५. अभियोग पक्षातर्फे एकूण दोन साक्षीदार तपासण्यात आले. आरोपींविरुध्द पुरावा आला नाही म्हणून सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला व आरोपी क्र.१ ते ४ यांचेविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे जबाब वगळण्यात आला .

६. प्रस्तूत प्रकरणातील वस्तूस्थितीवरुन माझे विचारार्थ पुढील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष मी कारणासहीत पुढीलप्रमाणे देत आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १) अभियोग पक्ष हे सिध्द करतो का की, दिनांक ०८/०६/२००९ रोजी रात्री ०८.०० वाजणेचे सुमारास मौजे कारी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे आरोपींनी आपसात संगनमत करुन आरोपी क्र. ४ याने फिर्यादीचे राहते घरात अनाधिकाराने घुसून फिर्यादीस झोंबाझोंबी, मारहाण व शिवीगाळी केली व त्यानुसार भा.दं.वि. कलम ४५२ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| २) अभियोग पक्ष हे सिध्द करतो का की, उपरोक्त नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन आरोपी क्र. ४ याने फिर्यादीच्या घरात घुसून फिर्यादीशी झोंबाझोबी करुन स्तन दाबून, अंगावरील ब्लाउज फाडन्याचा प्रयत्न केला व तिला लज्ञा वाटेल असे कृत्य करुन फिर्यादीचा विनयभंग केला आणि त्यानुसार भा.दं.वि. कलम ३५४ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ३) अभियोग पक्ष हे सिध्द करतो का की, उपरोक्त नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन, फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण केली व इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्यानुसार भा.दं.वि. कलम ३२३ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ४) अभियोग पक्ष हे सिध्द करतो का की, उपरोक्त नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपींनी यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादीला व साक्षीदार यांना शिवीगाळ केली व त्यानुसार त्यांना प्रक्षोभित केले व | नाही. |

| | |
|---|---|
| अशा प्रक्षोभनामुळे त्यांच्या हातून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा अथवा त्यांचे हातून कोणताही अपराध घडावा असा त्यामागचा त्यांचा उद्देश होता व त्यानुसार भा.दं.वि. कलम ५०४ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | |
| ५) अंतिम आदेश ? | आरोपी क्र.१ ते ४ यांना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमीमांसा

### मुद्दा क्र.१ ते ४ साठी

७. मुद्दा क्र.१ ते ४ हे एकमेकांशी निगडीत असल्याने पुनर्लिखान टाळण्याच्या उद्देशाने सदर मुद्यांवरील कारणमीमांसा एकत्रीत देण्यात येत आहे.

८. प्रस्तुत प्रकरणामध्ये राणी अनिल काळे हे फिर्यादी आहेत. फिर्यादी स्वतः जखमी असल्याने फिर्यादीचा पुरावा सदर प्रकरणातील घटना शाबीत करण्याकरिता अत्यंत महत्वाचा आहे. फिर्यादी साक्षीदार क्र.१ राणी अनिल काळे (नि.क्र.४२) यांनी त्याचे पुराव्यादरम्यान कथन केले की, साक्षीदार आरोपींनी ओळखते. घटना कधी घडली हे साक्षीदारास आठवत नाही. घटनेला १० वर्षे झाले असतील. घटना संध्याकाळी झाली असल्यामुळे कुठे घडली होती हे साक्षीदाराच्या लक्षात नाही. घटनेमध्ये कोणी, कोणाला, कशाने, काय केले होते हेही साक्षीदाराच्या लक्षात नाही. आरोपींनी साक्षीदारास काही केले नाही. साक्षीदार पुढे असे ही कथन करतात की, पोलीस स्टेशनला गेले होते किंवा कसे हे त्यांना आठवत नाही. साक्षीदारास पुराव्यादरम्यान फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर कोणाचा अंगठा आहे हे साक्षीदाराचे लक्षात नाही. त्यामध्ये काय लिहिले आहे हे ही साक्षीदार यांच्या लक्षात नाही. सदर साक्षीदार क्र.१ यांनी अभियोगपक्षास प्रतिकुल साक्ष न दिल्याने सहा.सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास फितुर घोषित करुन त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतु सदर साक्षीदाराने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्यातर्फे विचारण्यात आलेल्या सर्व प्रश्नांची नकारार्थी उत्तरे दिलेली आहेत. अभियोग पक्षाचे उलटतपासामध्ये

साक्षीदारास जबाबातील रेखांकित भाग–अ वाचून दाखविण्यात आला. परंतु तशा आशयाची फिर्याद साक्षीदाराने पांगरी पोलीस स्टेशनला दिला नव्हती. साक्षीदाराने पुढे कथन केले की, त्यांचे व आरोपींची तडजोड झाली असून त्यांची आरोपींविरुद्ध काही तक्रार नाही.

०९. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले जखमी सा.क्र.२ सुरेश जिवन पवार (नि.क्र.४३) यांनी त्यांचे पुराव्यादरम्यान कथन केले की, ते आरोपींना ओळखतात. घटना कधी घडली, कुठे घडली हे त्यांचे लक्षात नाही. घटनेमध्ये कोणी, कोणाला, काय केले हे त्यांचे लक्षात नाही. घटनेमध्ये कोणाला काय झाले होते हे त्यांचे लक्षात नाही. घटनेमध्ये काय झाले होते हे साक्षीदार यांच्या ध्यानात नाही. सदर साक्षीदार क्र.२ यांनी अभियोगपक्षास प्रतिकुल साक्ष न दिल्याने सहा.सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास फितुर घोषित करुन त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतु सदर साक्षीदाराने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्यातर्फे विचारण्यात आलेल्या सर्व प्रश्नांची नकारार्थी उत्तरे दिलेली आहेत. अभियोग पक्षाचे उलटतपासामध्ये साक्षीदारास जबाबातील रेखांकित भाग–अ वाचून दाखविण्यात आला. परंतु तशा अशयाचा जबाब ते पांगरी पोलीस स्टेशनला दिला नव्हता. त्यांनी पुढे कथन केले की, त्यांचे व आरोपींची तडजोड झाली असून त्यांची आरोपींविरुद्ध काही तक्रार नाही.

१०. अभियोगपक्षातर्फे एकूण दोन साक्षीदार तपासण्यात आले. अभियोग पक्षातर्फे तपासलेल्या साक्षीदारांच्या पुराव्याचे काळजीपूर्वक अवलोकन केले. सदर साक्षीदारांनी त्यांचे जबाबाशी सुसंगत अशी साक्ष दिली नाही. तसेच सदर प्रकरणातील फिर्याद शाबीत झाली नाही. आरोपींनी घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.४६), व फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र (नि.क्र.४४ व ४५) मान्य केले आहेत. त्यामुळे अभियोगपक्षाने वैद्यकीय अधिकारी तसेच तपासी अधिकारी यांची साक्ष नोंदविली नाही. तसेच फिर्यादी व आरोपी यांनी तडजोड पुरसीस (नि.क्र.४१) दाखल केली आहे. प्रस्तुत प्रकरणातील घटनास्थळ पंचनामा आरोपींनी मान्य केल्यामुळे शाबीत झालेला आहे. सदर घटनास्थळ पंचनाम्यावरुन (नि.क्र.४६) घटनास्थळ हे कारी, ता. बार्शी येथील असल्याचे निष्पन्न होते. तसेच आरोपींनी वैद्यकीय प्रमाणपत्र (नि.क्र.४४ व ४५) मान्य केले असल्यामुळे ते देखील शाबीत झाले आहे. सदर वैद्यकीय प्रमाणपत्रावरुन फिर्यादी व साक्षीदार यांना दुखापत झाल्याचे निष्पन्न होते.

याठिकाणी हे नमूद करणे जरुरीचे की, आरोपी व फिर्यादी यांनी तडजोड पुरसिस (नि.क्र.४१) दाखल केली असून त्यावर मूळ फिर्यादीची सही आहे.

११. याठिकाणी हे नमूद करणे जरुरीचे की, घटनास्थळ, फिर्यादीस व साक्षीदार यांना झालेली दुखापत शाबीत झाली असली तरी फिर्यादीस व साक्षीदार यांना सदर दुखापत आरोपींनी केलेल्या मारहाणीमुळे झाली आहे ही बाब शाबीत होणे जरुरीचे आहे. फिर्यादी व ईतर जखमी साक्षीदार यांनी मारहाण झाली असे कथन केले आहे. त्यामुळे घटनेदिवशी आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण केली याबाबत अभियोग पक्षाने कोणताही प्रत्यक्षदर्शी पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. फिर्यादी व साक्षीदार यांना आरोपींनी मारहाण केली आहे असे साक्षीदाराने पुराव्यादरम्यान कथन केलेले नाही. त्यामुळे घटनेवेळी फिर्यादी व साक्षीदार यांना आरोपींनी मारहाण केली होती याबाबत साशंकता निर्माण होत आहे.

१२. आरोपींविरुध्द भा.द.वि. कलम ४५२, ३५४, ३२३, ५०४ सहकलम ३४ प्रमाणे दोषारोप ठेवलेले आहे. परंतु अभियोगपक्षास प्रस्तुत प्रकरणातील आरोपींनी संगनमत करुन, आरोपी क्र. ४ उत्तर शिंदे याने घरात घुसून फिर्यादीशी झोंबाझोबी केली व इतर सर्व आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण केली याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. त्यामुळे फिर्यादी व साक्षीदार यांना झालेली दुखापत शाबीत झाली असली तरी सदर दुखापत आरोपींनी मारहाण केल्यामुळे झाली ही बाब शाबीत केलेली नाही. त्यामुळे एकंदरीत सर्व परिस्थिती व पुरावा ध्यानात घेता अभियोगपक्ष आरोपींनी संगनमताने फिर्यादीला व साक्षीदार यांना मारहाण केली ही बाब निःसंशयपणे शाबीत करु शकले नाही.

१३. तसेच प्रस्तुत प्रकरणामध्ये फिर्याद अशी की, घटनेवेळी आरोपींनी फिर्यादीला मारहाण केली. तसेच फिर्यादीना शिवीगाळ केली आहे. फिर्यादमध्ये आरोपींनी शिवीगाळ केली असे संदिग्धपणे सांगितले आहे. आरोपींनी नेमके कोणत्या शब्दांचा उच्चार केला व त्यामुळे सार्वजनिक शांतता भंग झाली असे स्पष्टपणे दर्शविणारा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अशा परिस्थितीत आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ केली हे शाबीत झाले असा निष्कर्ष काढता येणार नाही.

१४. त्यामुळे उपरोक्त सर्व बाबी व कारणमीमांसा ध्यानात घेता अभियोगपक्षास आरोपी क्र.१ ते ४ यांना भा.दं.वि.चे कलम ४५२, ३५४, ३२३, ५०४ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे हे शाबीत करण्यास अपयश आलेले आहे. त्यामुळे, मी मुद्दा क्र.१ ते ४ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.५ साठी**

१५. फौजदारी प्रकरणांमध्ये आरोपींचा गुन्हा शाबीत करण्याची जबाबदारी अभियोगपक्षाची असते. प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोगपक्षाने आरोपीचा गुन्हा निःसंशयपणे शाबीत करण्याकरिता विश्वासार्ह पुरावा दिला नाही. प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोगपक्ष आरोपीं विरुध्दचा गुन्हा निःसंशयपणे, वाजवी साशंकतेच्या पलीकडे सिध्द करु शकले नाही. तसेच साक्षीदारांच्या पुराव्यावरुन असे निष्पन्न होते की, फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये तडजोड झाल्यामुळे साक्षीदारांविरुध्द त्यांनी खोटी साक्ष दिली आहे म्हणून कारवाई करणे उचित होणार नाही. प्रस्तुत प्रकरणातील सर्व बाबी व परिस्थिती तसेच अभिलेखावरील पुरावा व मुद्यांवरील निष्कर्ष या सर्व बाबी लक्षात घेवून आरोपींना सदर गुन्हयातून निर्दोष सोडणे उचित राहिल. मुद्दा क्र.१ ते ४ च्या निष्कर्षाच्या अनुषंगाने मुद्दा क्र. ५ च्या निष्कर्षासाठी खालील आदेश करण्यात येतो.

**आदेश**

१. आरोपी क्र.१) सतीश काळू शिंदे, २) शांताबाई सतीश शिंदे, ३) शिवाजी सतीश शिंदे व आरोपी क्र. ४) उत्तम काळू शिंदे यांना भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४५२, ३५४, ३२३, ५०४ सहकलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८ (१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपी क्र.१ ते ४ यांनी खटला प्रलंबित असताना दिलेले जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३. आरोपी क्र. १ ते ४ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ प्रमाणे, अपीलीय न्यायालयासमोर हजर राहण्यासाठी, प्रत्येकी रु. १५,०००/- वैयक्तिक जातमुचलक्याची पुर्तता करावी.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५२ प्रमाणे जप्त मुद्देमाल दोन काठया या मूल्यहीन

असल्याने अपील कालावधीनंतर त्या नियमाप्रमाणे नष्ट करण्यात याव्या.

५. या न्यायनिर्णयाची प्रत फिर्यादी यांना संबधीत जिल्हाधिकारी यांचे मार्फत फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३६५ प्रमाणे पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषीत करण्यात आला.)

GAYATRI SUDHAKAR PATIL
Digitally signed by GAYATRI SUDHAKAR PATIL
Date: 2026.03.20 16:47:27 +0530

( जी. एस. पाटील)

दिनांक – १७/०३/२०२६                न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, बार्शी, जि. सोलापूर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | K. S.Naik (Grade III) |
| (b) | Court | : | Smt. G.S. Patil,<br>2nd Jt. Civil Judge,<br>J.D.& J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order decided by P.O. on | : | 17/03/2026 |
| (d) | Judgment /Order signed by P.O. on | : | 17/03/2026 |
| (e) | Judgment /Order uploaded on | : | 20/03/2026. |